# शासकीय तंत्रनिकेतन, अंबड.

म्हाडा कॉलनी, पाचोड रोड, अंबड

E-mail : gpambad.dte@gmail.com


## शैक्षणिक वर्षे २०१७-१८ मध्ये शासकीय तंत्रनिकेतन अंबडच्या एकुण ६० विद्यार्थ्यांची कॅंम्पस मुलाखतीद्वारे विविध नामांकित औद्योगिक कंपन्यांमध्ये निवड.

अंबड: शैक्षणिक वर्षे २०१७-१८ हे वर्ष शासकीय तंत्रनिकेतन अंबडच्या प्रशिक्षण व आस्थापना विभागासाठी यशोगाथा लिहीणारे ठरले. या शैक्षणिक वर्षात संस्थेच्या सर्व विभागाच्या एकुण ६० विद्यार्थ्यांची कॅंम्पस मुलाखतीद्वारे विविध नामांकित औद्योगिक कंपन्यांमध्ये निवड करण्यात आली अशी माहिती संस्थेचे प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी प्रा.एस. आर. पाटील सर यांनी दिली आहे.

गतवर्षात मॅंकिनो लिमिटेड, बॅंगलोर, जी.ई.ईंडिया लिमिटेड, पुणे, बजाज अॅटो लिमिटेड,औरंगाबाद,एल अॅड टि कन्स्ट्रक्शन्स लिमिटेड, मुंबई,वेरॉक ईंजीनिअरींग ,औरंगाबाद, भारत फोर्ज लिमिटेड, पुणे,अॅकुरेट ईंजीनिअरींग कंपनी, पुणे, फोर्बस अॅड कंपनी, वाळुज, औरंगाबाद, जॉन डिअर ईंडिया लिमिटेड, पुणे,बजाज अॅटो लिमिटेड, पुणे, एन.आर. बिअरींग ,औरंगाबाद, या औद्योगिक क्षेत्रातील नामांकित कंपन्याद्वारे आयोजित कॅंम्पस मुलाखतीद्वारे यश संपादन करत विद्यार्थ्यांनी आपली अभियांत्रिकी क्षेत्रातील अभियंता व समकक्ष पदाची नौकरी पक्की केली आहे. या यशाकरीता संस्थेचे प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी प्रा.एस. आर. पाटील यांच्या परिश्रम व नियोजनाचा सिंहाचा वाटा आहे. प्रशिक्षण व आस्थापना विभागासोबतच, सर्व विद्यार्थी, विविध विभागाचे विभागप्रमुख, पालक , औद्योगिक संस्थाशी निगडीत मनुष्यबळ विकास विभागाचे व्यवस्थापक यांच्यातील सुसंवाद व अंतर्गत सहकार्यामुळे हे यश मिळाल्याची भावना प्रा.एस. आर. पाटील यांनी व्यक्त केली. या संस्थेचे तसेच इतर संस्थाचे संपर्कात असणारे माजी विद्यार्थी ,प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी यांचेदेखील सहकार्य लाभले असे त्यांनी आवर्जून नमूद केले. प्रा. पी.यु. आवटे यांचे वेळोवेळी मिळालेले सहकार्य यामुळे काम करण्यास हुरूप येऊन गती मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

या यशाबद्दल संस्थेचे नवनिर्वाचित प्राचार्य डॉ. ए.एम. जिंतुरकर , अणुविद्युत विभागाचे विभागप्रमुख प्रा.डि.डि.अहिरराव, प्रा.डॉ.एस.एस.कानडे, यंत्र विभागाचे विभागप्रमुख डॉ.डि.एस. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना तसेच प्रशिक्षण व आस्थापना विभागास शुभेच्छा दिल्या आहेत.





